# कार्यालय मध्यवर्ती संशोधन केंद्र
## डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापिठ, अकोला

जा.क्र. म.सं.के./तांत्रिक/ ८७० /२०२१ दि. २९/०९/२०२१

### निविदा सूचना

**विषय:- सन २०२१-२२ करीता मध्यवर्ती संशोधन केंद्र, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला अंतर्गत प्रक्षेत्रावरील बिजोत्पादन कार्यक्रम पिकांची कंत्राटी पद्धतीने कापणी व गंजी लावण्याचे कामासाठी प्रति हेक्टर दराकरिता निविदा (कोटेशन) मागविणेबाबत.....**

वरील विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते कि, मध्यवर्ती संशोधन केंद्र, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला अंतर्गत विविध विभागाचे प्रक्षेत्रावरील बिजोत्पादन कार्यक्रम पिकांचे कंत्राटी पद्धतीने कापणी व गंजी लावण्याचे कामासाठी प्रति हेक्टर दर खालील प्रमाणे अटी व शर्तीस अधीन राहून मागविण्यात येत असून निविदेचे स्वरूप/निविदा मसुदा सोबत जोडण्यात आलेला आहे.

**अटी व शर्ती**

१. निविदा/कोटेशन कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी **सकाळी १०.०० ते दुपारी ५.३०** या वेळेत स्वीकारल्या जातील.
२. निविदा/कोटेशन **संचालक, मध्यवर्ती संशोधन केंद्र, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला** याचे नावाने सीलबंद लिफाफामधे पाठवावी. तसेच लिफाफ्यावर **"पिकांची कापणी व गंजी लावणे करीता प्रति हेक्टर दर"** असे नमूद करावे.
३. मध्यवर्ती संशोधन केंद्र कार्यालया अंतर्गत ज्या विभागावर काम उपलब्ध असेल त्याच विभागावर काम करावे लागेल.
४. विभागांचे प्रक्षेत्रावरील बिजोत्पादन कार्यक्रम पिकांचे कापणी व गंजी लावण्याचे काम करीत असतांना कोणताही मजूर व आवश्यक साहित्य या कार्यालातर्फे पुरविण्यात येणार नाही.
५. विभागांचे प्रक्षेत्रावरील बिजोत्पादन कार्यक्रम पिकांचे कापणी व गंजी लावण्याचे काम करीत असतांना दुर्घटना/अपघात किंवा जीवित हानी झाल्यास संपूर्ण जबाबदारी संबंधित कंत्राटधारकाची राहील.
६. विभागांचे प्रक्षेत्रावरील बिजोत्पादन कार्यक्रम पिकांचे कापणी व गंजी लावण्याचे काम करीत असतांना नुकसान झाल्यास विद्यापीठ प्रशासनाने ठरवून दिलेल्या निकषाप्रमाणे नुकसान भरपाई संबंधित कंत्राटधारका कडून वसूल करण्यात येईल.
७. विभागांचे प्रक्षेत्रावर कोणताही वाद विवाद निर्माण झाल्यास सदर वाद विवाद विद्यापीठ विधी विभागाचे अधिकारी/ मा. संशोधन संचालक, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला यांचे समक्ष मिटविला जाईल व अंतिम निर्णय मा. संशोधन संचालक, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला यांचा राहील आणि तो सर्वांना मान्य करणे बंधनकारक राहील.
८. विभागावर देण्यात आलेले पिकांचे कापणी व गंजी लावण्याचे काम पूर्ण करण्यात यावे, कामाबाबत विभागावरून तक्रार आल्यास किंवा काम सोडून गेल्यास सदर कामाचे देयक काढण्यात येणार नाही.
९. पिकांचे कापणी व गंजी लावण्याचे काम देण्यात आलेल्या कंत्राट धारकांनी देयक सादर करतेवेळी बँक खाते बाबतची संपूर्ण माहिती सादर करावी अन्यथा देयकाचा विचार केला जाणार नाही.
१०. विद्यापीठ प्रशासनाने वेळोवेळी निर्देशित केलेल्या नियमांचे पालन करणे संबंधित कंत्राट धारकांना बंधनकारक राहील.
११. वरीलप्रमाणे अटी व शर्तीस अधीन राहून सोबत जोडलेल्या निविदा मसुदा तपशिला नुसार **दि. ०८.१०.२०२१** रोजी पर्यंत कार्यालयीन वेळेत निविदा सीलबंद लीफाफामध्ये सादर करावी.

संचालक
मध्यवर्ती संशोधन केंद्र
डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला

# निविदा मसुदा

मध्यवर्ती संशोधन कैंद्र, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला अंतर्गत विविध विभागाचे प्रक्षेत्रावरील बिजोत्पादन कार्यक्रम पिकांचे कापणी व गंजी लावण्याचे कामाकरिता प्रति हेक्टर दर खालील प्रमाणे आहेत.

| अ. क्र. | पिकाचे नाव | कापणी व गंजी लावण्याचे कामाकरिता दर प्रति हेक्टर (रु.) |
|---|---|---|
| १ | सोयाबीन | |
| २ | तुर | |
| ३ | कराळ | |
| ४ | हरभरा | |
| ५ | करडी | |

निविदा सुचनेमधील संपूर्ण अटी व शर्ती मला सर्वस्वी मान्य आहेत.

**ठिकाण:**

**दिनांक:**

**स्वाक्षरी**

नाव व संपूर्ण पत्ता